संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लोकशाहीत समाजकारणाला स्थान काय?

**शेवटी** भारतीय लोकशाही ही राजकारणाचीच बटीक ठरली आहे. म्हणजेच लोकशाहीला राजकारण्यांनी आपल्या हातातले खेळणे बनवले आहे. नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल हे राजकारणाची दिशा सांगणारे ठरले. परंतु, लोकशाहीच्या भवितव्याबद्दल शाश्वती देणारे नाहीत हे आम्ही स्पष्टपणे सांगू इच्छितो. राजकारणातील त्या ऐतिहासिक विजयाबद्दल म्हणजेच प्रामुख्याने उत्तर प्रदेश, उत्तराखंडमधील विजयाबद्दल आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करतो. मात्र, त्याचवेळी हा विजय त्या त्या राज्यातील सामान्य माणसाच्या अपेक्षा आकांक्षा पूर्ण करणारा ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो. भारत हा जगातला सर्वात मोठा लोकशाहीवादी देश असेल, तर लोकशाहीत केवळ राजकारणच प्रभावी ठरून चालणार नाही. दुर्दैवाने राजकारण हे लोकशाहीतले माध्यम ठरण्याऐवजी साध्य झाले आहे. ज्या लोकशाहीचा पाया किंवा आधार खरे तर समाजकारण असण्याची गरज आहे. परंतु, आज राजकारणातून समाजकारण केवळ वजाच नव्हे, तर हद्दपार होताना दिसते. त्याचा दुसरा अर्थ असा होतो की, तुम्हाला निवडणूक लढवायची असेल, तुम्हाला निवडून यायचे असेल तर तुम्हाला राजकारणच केले पाहिजे. केवळ समाजकारण करून समाजसेवेत आख्खे आयुष्य घालवले तरी मतदार तुमची पत्रास ठेवायला तयार नाहीत. तुमची दखलही घ्यायला तयार नाहीत. राजकारण करता येणं म्हणजे काय हे कोणालाही वेगळं सांगायला नको. सर्व प्रकारच्या लबाड्या, खोटारडेपणा, यामध्ये त्या व्यक्तीने निष्णात असायला हवे. पैसे खाण्याच्या विविध मार्गाची त्याला पूर्ण माहिती असावी किंवा निवडून आल्यानंतर पैसा प्राप्त करण्याच्या कलेत तो तरबेज असावा. त्याला खात्रीपूर्वक किंवा आत्मविश्वासाने खोटे बोलण्याचा चांगला सराव असावा. दिलेला शब्द, आश्वासन पाळण्याबाबत त्याला सोयीस्करपणे मौन बाळगण्याची सवय असावी. सामान्य मतदाराचा आपल्यावर खूप विश्वास बसेल अशी त्याची वागणूक नसावी. शब्दाला जागण्यापेक्षा शब्दाला फुगवण्याचे कसब त्याच्याकडे असावे जसे गरिबी हटाव, भ्रष्टाचार निर्मूलन, अच्छे दिन, पारदर्शकता हे शब्द योग्यवेळी फुगवता येणे आवश्यक ठरत आले होते. अशा सर्व राजकीय कसरती आणि करामतीत कसलेल्या व्यक्तीच राजकारणाच्या दावेदार ठरू शकतात हे पुन्हा नव्याने सिध्द झाले आहे.

### लोकशाहीसाठी मारक

जशी राजकारणातून समाजकारणाची हकालपट्टी १९७७ नंतर सुरू झाली. जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीचा नारा देऊन समाजातल्या तरुणांना संघटित केले. गुजरातमध्ये याच सामाजिक ध्येयाने युवकांनी नवनिर्माण आंदोलन उभे केले. आणीबाणीनंतर ही सगळी आंदोलने निष्प्रभ होत गेली. अगदी अलीकडे अण्णा हजारे यांनी याच साामजिक हेतूने तेरा दिवसांचे उपोषण केले. परंतु, तिथेही याच समाजकारणाचा पराभव झाला. अण्णांना बाजूला ठेवून केजरीवालांनी राजकारण केले. समाजकारणाला त्यांनी तिलांजली दिली. आताच्या विधानसभा निवडणुकांमध्ये असेच चित्र पाहायला मिळाले. मणिपूरमध्ये समाजासाठी उपोषण करणाऱ्या आपला जीव धोक्यात घालणाऱ्या शर्मिला इरोम यांचा पराभव झाला. कोणताही स्वार्थ नसताना केवळ समाजासाठी राजकारणाचा उपयोग करण्याचा त्यांचा हेतूदेखील राजकारण्यांनी यशस्वी होऊ दिला नाही. राजकारणातल्या त्या प्रचंड धनशक्तीपुढे सर्वसाधारण अशा या महिला सामाजिक कार्यकर्तीलाही हार पत्करावी लागली. इकडे गोव्यात मातृभाषेचा अतिशय महत्त्वाचा सामाजिक मुद्दा घेऊन गेल्या. सुरक्षा मंचालाही पराभूत व्हावे लागले. ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेले आणि केवळ देशहित समाजहिताचाच विचार करणाऱ्या सुभाष वेलिंगकर यांच्या मंचाचा पराभव म्हणजे सध्याच्या राजकारणात सामाजिक मुद्दे किंवा स्वच्छ चारित्र्याला अजिबात किंमत नाही, याचेच दर्शन घडविणारा ठरतो. स्वच्छ चारित्र्य आणि स्वच्छ प्रतिमा या दोन गोष्टीत जमीन आसमानाचा फरक असतो. राजकारणात चारित्र्य स्वच्छ राहूच शकत नाही, अशी आज एकंदर परिस्थिती आहे. समाज किंवा विविध मुद्यांसाठी समाजकारण करणाऱ्यांना या लोकशाहीत कसे स्थान नाही, हे या उदाहरणांवरून स्पष्ट होते

### चांगले राजकारणापासून दूर

एरवी राजकारणातल्या सर्व वाईट प्रवृत्तीचा वीट आल्याने अनेक चांगले लोक अपक्ष म्हणून निवडणूक लढवितात. चांगल्या लोकांनी राजकारणात यावे, म्हणून अनेक चांगले लोक अपक्ष म्हणून निवडणूक लढवितात. चांगल्या लोकांनी राजकारणात यावे म्हणून अनेकवेळा बोलले जाते. परंतु, त्यांना राजकारणात प्रवेशच मिळणार नाही आणि मिळाला तरी त्यांना टिकू देणार नाही. अशीच सर्व व्यूहरचना केलेली असते. अन्यथा तब्बल ६ वर्षे मणिपूरमध्ये लष्कराच्या विशेषाधिकार कायद्याविरोधात उपोषण करणाऱ्या शर्मिला इरोम यानां पराभूत व्हावे लागले नसते. कारण लोकांनीही त्यांना मतदान करू नये, हे एक आश्चर्य आहेच. परंतु, मतदारांना त्यापासून म्हणजे चांगल्या माणसांना मतदान करण्यापासून वंचित ठेवण्यासाठी जी धनशक्ती वापरली जाते, त्यात ही सामाजिक शक्ती टिकून राहू शकत नाही. सामाजिक हेतू ठेवून किंवा प्रदीर्घ काळ सामाजिक कार्य करूनही त्यांना मतदारांकडून प्रतिसाद मिळत नसेल, प्रत्यक्ष मतदान होत नसेल तर त्याला केवळ मतदारांना दोष देता येत नाही. तर सध्याच्या राजकारणालाही त्याचा दोष द्यावा लागेल. अशा राजकारणाने जर लोकशाही व्यवस्था व्यापलेली असेल तर देशातील भ्रष्टाचार कमी होण्याची सूतराम शक्यता राहात नाही. रोकडविरहीत व्यवहार केल्याने भ्रष्टाचार कमी होईल असे मानले जाते. परंतु, तेही पूर्ण सत्य नाही. याचा दुसरा आणि महत्त्वाचा अर्थ असा होतो की, राजकारण करणाऱ्यांची एक विशिष्ट कार्यपध्दती ठरून गेली आहे. तर राजकीय पक्षांकडे बघण्याची किंवा त्यातल्या लोकांना निवडून देण्याची मतदारांचीसुध्दा एक विशेष प्रकारची मानसिकता तयार झाली आहे. कितीही चांगला, प्रामाणिक उच्चशिक्षित अपक्ष उमेदवार उभा असला तरी त्याच्याकडे पाहण्याचा मतदारांचा सापत्न दृष्टीकोन असतो. तर तोच उमेदवार जर राजकीय पक्षाच्या तिकिटावर उभा राहिला तर त्याच्यामागे राजकीय पक्षाची ताकद असेल तर ते त्यांना महत्त्वाचे वाटते. कारण राजकीय पक्षाची ताकद म्हणजे पैसा, कार्यकर्ते आणि एखादा प्रश्न सोडवायचाअसेल, तर तो एकटा अपक्ष उमेदवार सोडवू शकणार नाही. त्याच्या पाठीमागे पक्षाची ताकद नाही असा निष्कर्ष मतदार काढतात. परंतु, त्याच्या उमेदवाराने कितीही चांगले काम केले असले तरी त्याची या राजकीय बाजारात किंमत राहात नाही, लोकशाहीची ही शोकांतिकाच नाही का?